# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः04.03.2026** **वारःबुधवार**

---

1. बळकट अर्थव्यवस्थेमुळे भारत हा जगासाठी आशेचा किरण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन
2. पश्चिम आशियातील संघर्ष तीव्र झाल्याच्या पार्श्वभूमीवर, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची कतार, कुवेत, ओमानच्या प्रमुखांशी चर्चा
3. भारताकडं 40 ते45 दिवस पुरेल इतका तेलसाठा, पेट्रोलियम मंत्री हरदीप सिंह पुरी यांची माहिती
4. आखाती देशांसाठी विमानसेवा अंशतः सुरू, देशातील विमानकंपन्यांकडून आज 58 उड्डाणांचं नियोजन आणि
5. टी ट्वेंटी विश्वचषक क्रिकेट स्पर्धेच्या पहिल्या उपांत्य फेरीत आज दक्षिण आफ्रिका आणि न्यूझीलंड यांच्यात लढत.

**<u>अर्थसंकल्प वेबिनार</u>**

बळकट अर्थव्यवस्थेमुळे भारत हा जगासाठी आशेचा किरण बनला असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. अर्थसंकल्पानंतरच्या एका ऑनलाइन चर्चासत्रामधे 'शाश्वत आणि सशक्त आर्थिक प्रगती' या विषयावर ते बोलत होते. आज जग परिवर्तनशील आणि विश्वासार्ह भागीदाराच्या शोधात आहे, त्यामुळे भारताला ही एक मोठी संधी आहे, असं मोदी यांनी सांगितलं. गुणवत्तेबाबत तडजोड न करण्याची जबाबदारी सर्वांची असून देशात तयार होणारी उत्पादनं जागतिक दर्जाची असायला हवीत असं ते म्हणाले. यावेळी पंतप्रधानांनी उद्योजकांना गुंतवणूक करण्याचं तसंच तंत्रज्ञानाचा स्वीकार करण्याचं आणि संशोधनाला प्रोत्साहन देण्याचं आवाहन केलं.

**<u>पश्चिम आशिया संघर्ष</u>**

इस्राईल आणि अमेरिकेच्या संयुक्त सैन्यानं काल इराणमधील तेहरानच्या अणु प्रकल्पांवर हल्ला केल्यानंतर इराणनंही हल्ल्यांची तीव्रता वाढवली आहे. इराणनं पश्चिम आशियातील अनेक देशांवर हल्ले सुरू ठेवले आहेत. यामुळं पश्चिम आशियातील संघर्ष अधिक तीव्र झाला आहे. संयुक्त अरब अमिराती (यूएई) च्या संरक्षण मंत्रालयाने सांगितले की त्यांच्या हवाई संरक्षण प्रणालींनी काल इराणनं डागलेली 11 बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे आणि 123 ड्रोन रोखले, तर एक क्षेपणास्त्र देशाच्या हद्दीत कोसळले आणि कोणतीही मानवी हानी झाली नाही. दुसरीकडं, इस्राईलनं लेबनॉनवरही हवाई हल्ले तीव्र केले असून, दहशतवादी संघटना हिजबुल्लाहशी संबंधित सुमारे साठ ठिकाणांवर हल्ला केला आहे.

**<u>मोदी-चर्चा</u>**

पश्चिम आशियातल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर काल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कतार, कुवेत, ओमान यासारख्या देशांच्या प्रमुखांशी दूरध्वनीद्वारे चर्चा केली. यावेळी त्यांनी आखाती देशांमधल्या परिस्थितीविषयी चिंता व्यक्त केली आणि तिथे राहणाऱ्या भारतीयांच्या सुरक्षिततेबाबत चर्चा केली. या देशांमधल्या भारतीयांच्या सुरक्षेसाठी घेत असलेल्या काळजीबाबत त्यांनी या देशांची प्रशंसा केली. हा संघर्ष थांबवण्यासाठी संवाद आणि राजनैतिक धोरणांची गरज असल्यावरही पंतप्रधान मोदी यांनी भर दिला. दरम्यान, परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉक्टर एस. जयशंकर यांनीही परराष्ट्र व्यवहार आणि संरक्षण धोरण विषयक युरोपीय महासंघाचे उच्चायुक्त काजा कल्लास यांच्याशी दूरध्वनीवर चर्चा केली.

**<u>परराष्ट्र मंत्रालय</u>**

अमेरिका आणि इराणमधील संघर्ष थांबवण्यासाठी राजनैतिक उपाय योजण्याचे तसंच संवाद साधण्याचं आवाहन भारतानं पुन्हा केलं आहे. हा संघर्ष लवकरात लवकर संपवण्याच्या बाजूनं भारत आहे, असं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं म्हटलं आहे. जवळपास एक कोटी भारतीय आखाती देशात काम करतात, त्यांची सुरक्षितता भारतासाठी महत्त्वाची आहे, ज्या गोष्टीचा भारतावर थेट परिणाम होतो, त्यापासून भारत अलिप्त राहू शकत नाही, असं या निवेदनात म्हटलं आहे. पश्चिम आशियातल्या अस्थिरतेचा भारतीय अर्थव्यवस्थेवर  परिणाम होऊ शकतो, भारताचे लोक जगभरात कामासाठी विखुरले आहेत, त्यामुळे भारत जहाजांवरच्या हल्ल्यांनाही ठामपणे विरोध करतो, असं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे प्रवक्त रणधीर जयस्वाल यांनी सांगितलं.

**<u>मंत्रीगट</u>**

पश्चिम आशियातल्या युद्धजन्य परिस्थितीवर लक्ष ठेवण्यासाठी केंद्र सरकारनं मंत्र्यांची समिती स्थापन केली असून याची दैनंदिन बैठक घेतली जात असल्याची माहिती केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांनी दिली आहे. निर्यात विषयक परवानग्यांना गरजेनुसार शिथिलता देणं, सीमा शुल्क आणि बंदरे खात्यात समन्वय साधून आयातीसाठी सुलभ परवानगी मिळवून देणं, वित्त आणि विमा क्षेत्रातल्या संस्थांशी समन्वय साधून निर्यातदारांच्या हितांचं रक्षण यासाठी ही समिती काम करणार आहे.

**<u>तेलसाठा-पुरी</u>**

पश्चिम आशियातल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर होर्मुजच्या सामुद्रधुनीतून येणारा तेल पुरवठा थांबला तर भारताकडे दहा कोटी बॅरल तेलाचा साठा शिल्लक असून हे तेल 40 ते 45 दिवस पुरेल एवढं आहे. याबाबत सरकार समाधानी असून गरज पडली तर उपाययोजना केल्या जातील, असं पेट्रोलियम मंत्री हरदीप सिंह पुरी यांनी सांगितलं. भारताकडे तेल वाहतुकीसाठी पर्यायी मार्गही उपलब्ध आहेत. परिस्थितीवर लक्ष ठेवण्यासाठी पेट्रोलियम  मंत्रालयाने नियंत्रण कक्ष स्थापन केल्याचं पुरी यांनी म्हणाले. दरम्यान, कतारनं आपत्कालिन परिस्थितीची घोषणा करत नैसर्गिक वायूचा पुरवठा 40 टक्क्यांपर्यंत कमी केला आहे. कतार हा नैसर्गिक वायूसाठी भारताचा सर्वात मोठा पुरवठादार आहे. देशातल्या एकूण नैसर्गिक वायू पैकी 40 टक्के कतारमधून आयात केला जातो. त्यामुळं पर्यायी व्यवस्था करण्याचे प्रयत्न तेल आणि नैसर्गिक वायू कंपन्यांनी सुरू केले आहेत.

**<u>तेलाच्या किमती</u>**

पश्चिम आशियातील संघर्ष तीव्र झाल्यानं आंतरराष्ट्रीय बाजारात नैसर्गिक वायू आणि कच्च्या तेलाच्या किमती वाढल्या आहेत आणि जागतिक शेअर बाजार कोसळले आहेत. सोमवारी झालेल्या तीव्र वाढीनंतर काल ब्रिटनमध्ये नैसर्गिक वायूच्या किमती तीन वर्षांच्या सर्वोच्च पातळीवर पोहोचल्या, तर कच्च्या तेलाच्या किमती जुलै 2024 नंतर पहिल्यांदाच 85 डॉलर्स प्रति बॅरलच्या वर गेला.

**<u>विमानसेवा-मंत्रालय</u>**

पश्चिम आशियातल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर दुबई आणि अबू धाबीहून भारताकडे येणारी विमानसेवा अंशतः पुन्हा सुरू झाली असून त्यामुळे तिथं अडकलेल्या हजारो भारतीयांना मोठा दिलासा मिळाला आहे. भारतीय विमान कंपन्या आज 58 उड्डाणे चालवण्याची योजना आखत आहेत, ज्यामध्ये इंडिगोच्या 30 आणि एअर इंडिया आणि एअर इंडिया एक्सप्रेसच्या 23 उड्डाणे समाविष्ट आहेत, अशी माहिती नागरी विमान वाहतूक मंत्रालयाने दिली आहे. आतापर्यंत भारतीय विमान कंपन्यांनी एक हजार दोनशेहून अधिक उड्डाणे आणि परदेशी विमान कंपन्यांनी जवळजवळ तीनशे ऐंशी उड्डाणे रद्द केली आहेत. मंत्रालय परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवत असून विविध देशांमध्ये अडकलेल्या प्रवाशांच्या सुखरुप परत आणण्यासाठी विशेष व्यवस्था केली जात आहे, असं मंत्रालयाने एका निवेदनात म्हटलं आहे. दरम्यान,

संयुक्त अरब अमिरातीमध्ये अडकलेल्या महाराष्ट्रातल्या 164 जणांना परत आणण्यासाठी दोन विमानांची व्यवस्था करण्यात आली आहे.

**सीबीएसई-परीक्षा**

युद्धजन्य परिस्थितीमुळे केंद्रीय उच्च माध्यमिक शैक्षणिक मंडळ अर्थात सीबीएसईने पश्चिम आशिया क्षेत्रामध्ये आयोजित दहावी आणि बारावीच्या पाच आणि सहा मार्च रोजी होणाऱ्या परीक्षा पुढे ढकलल्या आहेत. या परीक्षांच्या सुधारित तारखा नंतर जाहीर होणार आहेत. सात मार्चपासूनच्या परिक्षांचा निर्णय परिस्थितीच्या आढाव्यानंतर घेण्यात येईल असंही बोर्डाने म्हटलं आहे.

**स्पेन-अमेरिका**

इराणवरील संयुक्त हल्ल्यांना पाठिंबा देत नसल्याने आणि युरोपियन राष्ट्रांनी नाटोच्या खर्चात वाढ करण्यास विरोध केल्यानं स्पेनसमवेतचा व्यापार संपुष्टात आणण्याचा इशारा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनल्ड ट्रम्प यांनी दिला आहे. स्पेनचे परराष्ट्र मंत्री जोस मॅन्युएल अल्बारेस यांनी संयुक्त राष्ट्रांच्या सनदेत समाविष्ट नसलेल्या कोणत्याही हल्ल्यामध्ये दक्षिण स्पेनमधील तळांचा वापर स्पेन करू देणार नसल्याचे म्हटले आहे. अल्बारेस यांच्या वक्तव्यानंतर लगेचच ट्रम्प यांनी ही भूमिका घेतली आहे.

**श्रीलंका-राष्ट्रपती-आखात**

श्रीलंकेचे राष्ट्रपती अनुरा कुमार दिसानायके यांनी आखातातील संघर्षाचे लवकर आणि शांततापूर्ण निराकरण करण्याचं आवाहन केलं आहे. दीर्घकालीन युद्धजन्य परिस्थितीमुळे जागतिक आणि प्रादेशिक अर्थव्यवस्थांना मोठा फटका बसू शकतो असं त्यांनी श्रीलंकेच्या संसदेला संबोधित करताना म्हटलं आहे. सद्य संघर्षामुळे उद्भवणाऱ्या संभाव्य अल्पकालीन आणि दीर्घकालीन आव्हानांचे व्यवस्थापन करण्यासाठी त्यांनी सरकार, संसद आणि नागरिकांना परस्पर सहकार्य राखण्याचं आवाहन केलं आहे.

**राज्यसभा-भाजप**

राज्यसभेच्या सहा राज्यातल्या जागांसाठी भारतीय जनता पक्षाने काल नऊ उमेदवारांची नावं जाहीर केली. नवनियुक्त पक्षाध्यक्ष  नितिन नबीन यांना बिहार मधून उमेदवारी देण्यात आली आहे. हरियाणातले माजी लोकसभा सदस्य संजय भाटीया तसंच ओदिशातले राज्यसभेचे सदस्य सुजीतकुमार आणि माजी सदस्य मनमोहन सामल हे वगळता सर्व नवे चेहरे आहेत. राज्यसभेच्या 37 सदस्यांचा कार्यकाळ येत्या एप्रिलमधे संपत असल्याने 16 मार्चला ही निवडणूक होणार आहे.

**क्रिकेट**

वीस षटकांच्या क्रिकेट विश्वचषकाच्या पहिल्या उपांत्य फेरीत आज दक्षिण आफ्रिका आणि न्यूझीलंड यांच्यात कोलकाता इथल्या ईडन गार्डन्स मैदानावर खेळला जाणार आहे. दक्षिण आफ्रिकेने अपराजित राहत उपांत्य फेरी गाठली, तर न्यूझीलंडने सुपर आठमध्ये सरस धावगतीच्या जोरावर पाकिस्तानला मागे टाकत अंतिम चारमध्ये स्थान मिळवले. या प्रकारच्या विश्वचषकात हे दोन्ही संघ सहाव्यांदा आमनेसामने येणार आहेत. तर उद्या मुंबईत दुसऱ्या उपांत्य सामन्यात भारताचा सामना इंग्लंडशी होणार आहे.

**या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.**